|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# North Maharashtra University, Jalgaon

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

**बातमी क्र.१**

जळगाव- १४ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या सभापतीपदी दिगंबर पवार (महात्मा फुले समाजकार्य महाविद्यालय,तळोदा) याची तर सचिवपदी प्रियंका चौधरी (खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर) या विद्यार्थिनीची बिनविरोध निवड झाली.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात विद्यार्थी परिषदेच्या सदस्याची आज दि.१४ फेब्रुवारी रोजी बैठक घेण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे उपस्थित होते. या बैठकीत सभापती व सचिव पदासाठी निवडीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. निवडणूक प्रक्रिया सुरु करण्याआधी आधी उपस्थित सदस्यांनी बिनविरोध निवड व्हावी यासाठी काही वेळ आपसात चर्चा केली आणि त्यानंतर सभापती पदासाठी दिगंबर पवार यांचे नाव पुनम पाटील यांनी सुचविले. तर योगिता पाटील यांनी अनुमोदन दिले. सचिव पदासाठी प्रियंका चौधरीचे नाव स्वप्नील चौधरी यांनी सुचविले व मनोज पाटील यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी प्रा.ए.बी.चौधरी यांनी सभापती व सचिवांचे नाव सभागृहात जाहिर केले. बिनविरोध निवड झाल्यानंतर कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी सभापती व सचिवांचे स्वागत केले.

या बैठकीत बोलताना कुलगुरुंनी विद्यार्थी परिषदेच्या सदस्यांनी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवाव्यात आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न मांडावेत अशी अपेक्षा व्यक्त करुन विद्यार्थी हितासाठी चांगले निर्णय घेतले जात असल्याचे सांगितले. यावेळी बोलताना नवनियुक्त सभापती दिगंबर पवार व सचिव प्रियंका चौधरी यांनी विद्यार्थी आणि विद्यापीठ यांच्यातील दुवा साधण्याचे काम केले जाईल असे सांगितले. विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा.ए.टी.इंगळे यांनी आभार मानले. या निवडणूकीसाठी उपकुलसचिव व्ही.व्ही.तळेले, फुलचंद अग्रवाल, सहायक कुलसचिव राम उगले, एन.जी.पाटील यांनी सहकार्य केले.

बैठकीला पुढील १५ सदस्य हजर होते- शुभम भोंगळे, प्रियंका चौधरी, स्वप्नील चौधरी, शुभम जैन, किर्ती कुंवर, मनोज पाटील, नेहा पाटील, पुनम पाटील, राधिका पाटील, योगिता पाटील, दिगंबर पवार, कंचन राजपूत, हर्षा तायडे, प्रकाश वसावे, शुभांगी येसकर.

---

**बातमी - २**

जळगाव दि.१४ ( ) :- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षातंर्गत टीसीएस, नाशिक या नामांकीत कंपनीतर्फे खुल्या परीसर मुलाखतींचे दि. १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी आयोजन करण्यात आले आहे.

या मुलाखतीसाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयातील बी.ए., बी. कॉम, बी. एस्स्सी. (संगणक सोडून इतर शाखा), बीबीएम, बीबीए अंतिम वर्षाला असणाऱ्या व २०१८ मध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दि. १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी सकाळी ९.३० वाजता विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष रुम नं.१०१, तळ मजला येथे उपस्थित रहावे, असे कक्षाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

---

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. १४ फेब्रुवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी